आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२९ जून २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत घोषणा

- विविध योजनांच्या लाभार्थ्यांना दर महिन्याच्या ५ तारखेला आर्थिक मदतीचे पैसे खात्यात जमा करण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णय विधीमंडळाचा हक्कभंग असल्याचा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा दावा

- संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळ्याचं आज आळंदी इथून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान

- भारत ठरला महिला कसोटी क्रिकेटमध्ये ६०० धावांचा टप्पा गाठणारा पहिला संघ

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जेतेपदासाठी आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना

**<><><><><>**

सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. तातडीनं अंमलबजावणी करण्यासाठी, लवकरच नियमावली तयार करून इच्छुकांकडून ऑनलाईन अर्ज मागवू, असं ते म्हणाले. आमदार प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भातली लक्षवेधी सूचना मांडली होती.

**<><><><><>**

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, यासह विशेष सहाय्याच्या योजनांचे पैसे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. तसंच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरल्या खेळाडूंना अर्हतेनुसार शासकीय नोकरी मिळण्याच्या लाभापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आवश्यकतेनुसार निकषांमध्ये बदल करण्यात येतील, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये, यासाठी सरकार बांधिल आहे. यासंदर्भात विरोधी पक्षानं दिलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करेल , असं आश्वासन त्यांनी दिलं. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर, माजी अध्यक्ष नाना पटोले आदी सदस्यांनी विधानसभेत ‘नीट’ परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचा मुद्दा स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता. मात्र, अध्यक्षांनी स्थगन फेटाळल्यानंतरही सभागृहात यासंदर्भात पवार यांनी निवेदन दिलं.

राज्यात विविध ठिकाणी स्फोटक किंवा तत्सम कारखान्यांमध्ये होणाऱ्या स्फोटांचा मुद्दा सभागृहात मांडण्यात आला. या घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना नुकसानभरपाई वाढवून देण्याची मागणी विरोधकांनी केली. या प्रकरणात, आत्तापर्यंत केलेल्या कारवाईची माहिती कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिली. दोषींवर कारवाई करू तसंच नुकसानभरपाई वाढवून देण्याबाबत योग्य निर्णय घेऊ, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

महापुरुषांची विटंबना करणाऱ्यांविरोधात कायदा आणावा, अशी मागणी भाजपचे आमदार नितेश राणे यांनी आज औचित्याच्या सूचनेद्वारे विधानसभेत केली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णय हा विधीमंडळाचा हक्कभंग असल्याचा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केला. याप्रकरणी हक्कभंग दाखल करणार असल्याचं ते म्हणाले. माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनीही त्याला दुजोरा दिला. अर्थसंकल्पाच्या मंजुरीची प्रक्रिया डावलून हा शासन निर्णय काढल्याचं वडेट्टीवार म्हणाले. प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन चालकांना परवाने देताना होणाऱ्या घोटाळ्यांचा मुद्दाही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. याप्रकरणी योग्य उपाययोजना करण्याची सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला केली.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी आज विरोधकांनी विधानपरिषदेत केली. गेले अनेक दिवस विधानपरिषदेचं सभापतीपद रिक्त आहे हे संविधानाला धरून नाही असं सांगत शेकापचे जयंत पाटील यांनी आज कामकाज सुरू होताच हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देखील जयंत पाटील यांच्या मुद्द्याला समर्थन देत लवकरात लवकर निवडणूक घेण्याची मागणी केली. चर्चेच्या माध्यमातून सर्वसहमतीनं देखील सभापती निवडण्याची विरोधकांची तयारी आहे, असं ते म्हणाले. या संदर्भात निर्णय घेण्यासाठी सरकारला थोडा वेळ द्यावा, सोमवारी गटनेत्यांच्या बैठकीत यावर चर्चा करता येईल असं उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

जनतेला विश्वासात घेऊन आणि स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधूनच राज्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची पुढची प्रक्रिया केली जाईल,अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम उपक्रम मंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली. या

महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याचं सांगत हा महामार्ग रद्द करावा अशी मागणी काँग्रेसचे सतेज पाटील यांनी आज लक्षवेधीच्या माध्यमातून केली होती. त्याला भुसे यांनी उत्तर दिलं.

शहरं विद्रुप करणाऱ्या बेकायदेशीर जाहिरात फलकांना चाप लावण्यासाठी आवश्यकता भासल्यास कायद्यात बदल केला जाईल, त्यासाठी समिती नेमण्याची देखील सरकारची तयारी आहे,असं या विभागाचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. मुंबईत घाटकोपर इथं झालेल्या होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे सुनील शिंदे यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे सरकारचं लक्ष वेधलं. याला सामंत उत्तर देत होते. मुंबई महानगर क्षेत्रातल्या बेकायदा होर्डिंग्जवर तसंच रस्त्याच्या कडेला असलेल्या डिजीटल होर्डिंला चाप लावण्यासाठी पुन्हा ३० दिवसांच्या आत सर्वेक्षण करून दक्षता पथकं नेमून कारवाई केली जाईल, असं सांगत सामंत यांनी सभागृहाला आश्वस्त केलं.

शाळा सुरु होऊन १५ दिवस होऊन गेले तरी ४५ लाख विद्यार्थी गणवेशाविना असल्याचा आरोप विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत केला. सरकारच्या एक राज्य एक गणवेश धोरणामुळे खासगी कंत्राटदाराला लाभ मिळाल्याचं दानवे म्हणाले. यावेळी दानवे यांनी शेंद्रा बीडकीन औद्योगिक पट्ट्यात जागतिक दर्जाच्या औद्योगिक सुविधा मिळत नसल्याचा प्रश्न लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. त्याला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिलं. गेल्या तीन वर्षांत दाओस इथं केलेले सामंजस्य करार आणि या करारांच्या अंमलबजावणीची वस्तुस्थिती मांडणारी श्वेतपत्रिका राज्य सरकार काढेल अशी घोषणा त्यांनी केली.

<><><><><>

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळ्याचं आज आळंदी इथून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान होत आहे. या सोहोळ्यासाठी राज्यभरातून भाविकांची गर्दी वाढली

आहे. प्रस्थानासाठी माउलींच्या चलपादुका चांदीच्या पालखीत विराजमान झाल्यानंतर हा पालखी सोहोळा वीणा मंडपातून बाहेर पडून सर्वप्रथम मंदिर प्रदक्षिणा करेल आणि समाधी मंदिराशेजारील आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यात रात्रीच्या मुक्कामासाठी विसावेल.उद्या सकाळी हा पालखी सोहोळा पुण्याच्या दिशेनं मार्गस्थ होणार आहे.

**<><><><><>**

तीन शतकांची परंपरा लाभलेल्या श्री संत साधू महाराज संस्थानच्या कंधार ते पंढरपूर पायी दिंडीला आजपासून सुरुवात झाली. नागरिकांनी मोठ्या जल्लोषात या पायी दिंडीचं शहरात ठिकठिकाणी स्वागत केलं. या दिंडीचा पहिला मुक्काम लोहा इथं असेल.

**<><><><><>**

शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना पदावरून हटवण्यात आलं आहे. पक्षानं निवेदनाद्वारे या संदर्भात माहिती दिली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत खांडे यांनी विरोधी पक्षाचे उमेदवार बजरंग सोनावणे यांना मदत केल्याची ध्वनिचित्रफीत व्हायरल झाली होती. तसंच त्यांना एका मारहाण प्रकरणात अटक झाली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षानं खांडे यांच्यावर कारवाई केली आहे.

**<><><><><>**

सीबीआयनं ३२ पारपत्र अधिकारी आणि मध्यस्थ आरोपींविरोधात भ्रष्टाचाराचे १२ गुन्हे नोंदवले आहेत. ज्या अर्जदारांची माहिती अपुरी आहे किंवा पूर्ण दस्तऐवज नाहीत, त्यांना पारपत्र जारी करण्यासाठी भ्रष्टाचार आणि  गैरप्रकार करण्याचे आरोप त्यांच्यावर आहेत. यात  मुंबईतल्या लोअर परळ आणि मालाड इथल्या पारपत्र सेवा केंद्रांमधले १४ अधिकारी १८ दलालांचा समावेश आहे. याप्रकरणी २६ जूनला सीबीआय आणि दक्षता अधिकाऱ्यांनी मुंबई आणि नाशिक इथं ३३ ठिकाणी शोधमोहीम राबवली होती.

<><><><><>

तीन नवीन फौजदारी कायदे 1 जुलै 2024 पासून  देशभर लागू होणार आहेत. या कायद्यांची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी केंद्रीय विधी आणि न्याय मंत्रालयानं उद्या मुंबईतल्या वरळी इथल्या  एनएससीआय सभागृह इथं “ फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग” या विषयावर परिषदेचं  आयोजन केलं  आहे.

या परिषदेचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कायदा आणि  न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या उपस्थितीत होणार आहे.

पोलीस, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील.

या परिषदेला विविध उच्च न्यायालयं, जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयांचे न्यायाधीश, माजी न्यायाधीश, वकील, पोलीस, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांमध्ये सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात ४ बाद २३६ धावा केल्या आहेत. दक्षिण आफ्रिका अजूनही ३६७ धावांनी पिछाडीवर आहे.

त्याआधी आज सकाळच्या पहिल्या सत्रातच भारतानं आपला पहिला डाव कालच्या ४ बाद ५२५ धावांवरून पुढे सुरु केल्यानंतर विक्रमी ६ बाद ६०३ धावांवर घोषित केला. ही महिला कसोटी क्रिकेटमधील आजवरची सर्वोच्च सांघिक धावसंख्या असून, भारत महिला कसोटी क्रिकेटमध्ये ६०० धावांचा टप्पा गाठणारा

पहिला संघ ठरला आहे. हा विक्रम रचताना भारतानं ऑस्ट्रेलियाच्या ९ बाद ५७५ या आजवरच्या सर्वोच्च सांघिक धावसंख्येला मागे टाकलं.

**<><><><><>**

वेस्ट इंडिजमध्ये सुरु असलेला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज बार्बोडस इथं  भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल. भारतानं गेल्या सात महिन्यांमध्येच दुसऱ्यांदा आयसीसी विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे.

**//<><><><><>//**